जा.क्र.का.15/दस्त/मु.शु./परिपत्रक/ 1187
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे-1
दि. 17 /12/2016.

**परिपत्रक :-**

विषय :- दस्तात नमूद आशय / वस्तुस्थिती विचारात घेऊन मूल्यांकन करुन मुद्रांक शुल्क आकारणीबाबत.

मुद्रांक शुल्काची आकारणी अचूक व योग्य होऊन शासनाच्या महसूलाचे नुकसान होऊ नये याकरिता, वार्षिक मूल्य दर तक्त्यासोबतच्या मूल्यांकनाकरिताच्या मार्गदर्शक सूचना प्रत्येक वर्षी सुधारीत करणेत येतात. त्याकरिता नोंदविलेले दस्त, दस्तात देणेत येणारे नाव, दस्तातील आशय इ.बाबी विचारात घेणेत येतात. केवळ दस्तास देणेत आलेले नाव / शिर्षक विचारात घेऊन मुद्रांक शुल्काची आकारणी झालेस शासनाच्या महसूलाचे नुकसान होणेची शक्यता आहे. व्यावसायिक स्वरुपाचे दस्त, कमी मुद्रांक शुल्क आकारणी व्हावी याकरिता वेगवेगळे शिर्षक देऊन नोंदणीसाठी सादर केले जाऊ शकतात. विकसन करारनामा दस्तामध्ये यापूर्वी बांधकाम क्षेत्र विभागणी केली जात होती, अलीकडे उत्पन्न विभागणीही केली जाते. याशिवाय विकास व्यवस्थापन करार (Development Management Agreement) अशा व अन्य शीर्षकाचे दस्त ही नोंदणीस येऊ शकतील. अशा दस्ताचे स्वरुप Joint Venture स्वरुपाचे असते हे दस्ताचे सखोल वाचनाअंतीच समजणे शक्य आहे.

नोंदणीसाठी प्राप्त दस्ताचे केवळ शिर्षक विचारात घेऊन मुद्रांक शुल्काची आकारणी न करता, दस्तात नमूद आशय / वस्तुस्थिती अवलोकनी घेऊन, दस्तातील मुद्दयांचा अभ्यास करुन दस्ताचा प्रकार ठरविणे व त्यानंतर सदर दस्तात लागू होणारी मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन दस्ताचे मूल्य ठरविणेत यावे. नोंदणीसाठी सादर दस्त विविध प्रकारचे असलेने सर्वच बाबींचा मार्गदर्शक सूचनेत समाविष्ट नसतो. तथापि दस्ताचा सविस्तर अभ्यास करुन त्यात नमूद बाबीनुसार देणारा व घेणारा यांपैकी कोणाचा किती लाभ होत आहे तसेच त्यांच्या जबाबदा-या (obligation & liabilities) काय आहेत यानुसार देणा-या व घेणा-याचे लाभाचे मूल्य मूल्यांकन तत्वानुसार परिगणित करणे आवश्यक आहे. मार्गदर्शक सूचनाबाबत याउपरही काही संदिग्धता असल्यास अशा दस्ताबाबत संबंधित कार्यालयाची धारणा / मत नमूद करुन आवश्यक कागदोपत्री पुराव्यासह मार्गदर्शन प्राप्त करुन घ्यावे.

सदर परिपत्रकाची प्रत नोंदणी व मुद्रांक विभागाच्या www.igrmaharshtra.gov.in या संकेतस्थळावर publication या सदराखाली circulars या ठिकाणी उपलब्ध आहे.

सही/-
( डॉ.रामास्वामी एन.)
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत माहितीसाठी सादर :-

1) मा.अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, (मदत व पुनर्वसन) मंत्रालय, मुंबई-32.
2) मा.प्रधान सचिव, (मदत व पुनर्वसन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-32.
3) मा.महालेखापाल (लेखापरिक्षा) - II, महाराष्ट्र, नागपूर.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :-

4) सहनोंदणी महानिरीक्षक, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.
5) उपसंचालक, नगर रचना, मूल्यांकन, मुंबई प्रदेश, मुंबई.
6) सहायक संचालक नगर रचना, मूल्यांकन,कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
7) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, (मुख्यालय), पुणे.
8) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक (संगणक) पुणे.
   -/ सदर परिपत्रकाची प्रत विभागाच्या संकेतस्थळावर upload करणेबाबतची कार्यवाही करणेत यावी.
9) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/लातूर/अमरावती/नागपूर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
   -/ सदर परिपत्रकाची प्रत आपले अधिनस्त सर्व नोंदणी कार्यालयांना पुरविणेत यावी. तसेच सदर परिपत्रक त्यांना प्राप्त झाले असून, ते वाचलेबाबत (Read & acknowledge) त्यांच्या कार्यालयाचा अहवाल प्राप्त करुन घेऊन या कार्यालयास पाठविणेत यावा.
10) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.
11) श्रीमती.निलीमा देसाई, NIC पुणे.

निर्गमित

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता